# गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर होणार मेट्रो चाचणी



। **मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मर्गिकेच्या चाचणीसाठी मेट्रो डब्यांची यशस्वी जोडणी झाल्यानंतर आता २८ ऑगस्टनंतर पहिली चाचणी घेण्यात येणार असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी स्पष्ट केले. त्या मेट्रो ३ संदर्भात आयोजित परिषदेत बोलत होत्या.

मेट्रो ३ मार्गिकेतील पहिली गाडी मरोळ-मरोशीतील तात्पुरत्या कारशेडमध्ये मागील आठवड्यात दाखल झाली आहे. या गाडीची यशस्वीपणे जोडणी करण्यात आली आहे. आता पुढील प्रक्रिया पूर्ण करत ऑगस्टअखेरीस मेट्रो गाडीची चाचणी करण्यात येणार असल्याचेही यावेळी भिडे यांनी सांगितले. संपूर्ण मेट्रो जोडणी तसेच मेट्रो डबे पूर्ण चार्ज झाल्यानंतर दहा-बारा दिवसांनंतर ओलांडून मेट्रोची चाचणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. २८ ऑगस्टनंतर गणेशोत्सवाची धामधूम असल्याने एमएमआरसीएल गणेश चतुर्थीचा मुहूर्त गाठण्याची शक्यता आहे.

## सिप्झ ते बीकेसी मेट्रो ३ पहिल्या टप्प्यासाठी डिसेंबर २०२३ चा मुहूर्त

। **मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ भुयारी मार्गाचा पहिला टप्पा सिप्झ ते बीकेसी डिसेंबर २०२३ पर्यंत, तर आरेतील कारशेडचे काम २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी गुरुवारी दिली. त्या मेट्रो ३ संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होत्या. यावेळी बीकेसी ते कुलाबा मेट्रो मार्गाचा दुसरा टप्पा २०२४ मध्ये पूर्ण करणार असल्याचेही भिडे यांनी स्पष्ट केले.

मेट्रो ३ च्या आराखड्याला २०११ ला मंजुरी मिळाल्यानंतर २०१३ ला २३ हजार १३६ कोटी रुपयांच्या प्रकल्प खर्चासाठी मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर विविध परवानग्या मिळवून प्रत्यक्ष कामाला २०१६ ला सुरुवात करण्यात आली. राज्य शासनाने दोन दिवसांपूर्वी मेट्रो ३ च्या १० हजार २७० कोटी रुपये वाढीव खर्चासाठी परवानग्या दिल्यानंतर अश्विनी भिडे यांनी गुरुवारी मेट्रो प्रकल्पाची सद्यस्थिती सांगितली. प्रकल्पाला विलंब झाल्याने प्रकल्प खर्चात वाढ झाल्याचे मान्य करत मुंबईतील भौगोलिक रचनेनुसार प्रकल्पात अडथळे निर्माण झाले होते. भिडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ हजार १३६ कोटींपैकी २१ हजार ८९० कोटी रुपये निधी मिळाला असून उर्वरित निधीसाठी ५२० कोटी रुपये सध्या शिल्लक आहेत. तर अतिरिक्त खर्चाची रक्कम मिळाल्यास प्रकल्प वेगाने मार्गी लागण्याची चिन्हे असल्याचे सांगण्यात आले आहे. मेट्रो ३ च्या आरे कारशेडचे २९ टक्के काम पूर्ण झाले असून पहिल्या टप्प्यातील कारशेडचे काम एप्रिल २०२३ मध्ये पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती भिडे यांनी दिली. तसेच दुसऱ्या टप्प्यातील कारशेडचे काम जुलै २०२३ मध्ये पूर्ण होईल. कारशेड पूर्ण करतानाच मेट्रो ३ मार्गिकेचा पहिला टप्पा (सिप्झ ते बीकेसी) डिसेंबर २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे. या पहिल्या टप्प्यासाठी सुरक्षा प्रमाणपत्र घेण्याच्या कामास जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये सुरुवात होईल, असेही भिडे यांनी सांगितले आहे.

### कुलाबा-वांद्रे-सिप्झ

- २०१३ रोजी मंजूर खर्च २३ हजार १३६ कोटी रुपये
- २०१६ रोजी मेट्रो ३ च्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात
- १० ऑगस्ट २०२२ रोजी वाढीव १० हजार २७० कोटी रुपये

### राज्य शासनाकडून मंजूर

- मेट्रो ३ चे टप्पा १ चे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करणार
- मेट्रो ३ टप्पा २ चे काम जून २०२४ पर्यंत पूर्ण करणार
- मेट्रो ३ कारशेडचे काम एप्रिल २०२३ पर्यंत पूर्ण होणार

*एकूण प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण

### मेट्रो ३ साठी अतिरिक्त जागा नको – भिडे

आरेतील ३० हेक्टर जागेवर कारशेड प्रस्तावित असून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आरेतील ६१ हेक्टर जागा ताब्यात घेतली आहे. यातील २५ हेक्टर जागेवर सध्या कारशेडचे काम करण्यात येत असून ५ हेक्टर जागा हरित क्षेत्र म्हणून संरक्षित करण्यात येणार असल्याचे एमएमआरसीकडून सांगितले जात आहे. सध्या आरे कारशेडमध्ये ९ गाड्यांचे स्टेबलिंग नियोजन आहे, तर २०३० पर्यंत ३१ गाड्या आणि २०५० पर्यंत ५५ गाड्या मेट्रो ३ साठी उपलब्ध होणार आहेत. सध्या कारशेडमध्ये २४० डबे राहू शकतात. पण २०३१ नंतर ५५ डबे अर्थात ५५ गाड्या कारशेडमध्ये ठेवण्यासाठी सध्याची कारशेड अपुरी पडणार आहे. मात्र भिडे यांनी सध्या मेट्रो ३ साठी अतिरिक्त जागेची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले असून २०४० नंतर १ किंवा २ हेक्टर जागेची आवश्यकता भासेल, असे स्पष्ट केले आहे.